# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५४/२००६/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. विश्वास मारूती पाटील,<br>विश्वास इंडस्ट्रिज, अर्जुननगर,<br>ता.कागल, जि. कोल्हापूर | तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>संवसु मंडळ कार्यालय,<br>कोल्हापूर.<br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>ग्रामीण विभाग – २, ताराबाई पार्क<br>कोल्हापूर.<br>३) सहाय्यक अभियंता (संवसु).<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु उपविभाग मुरगुड, जि.कोल्हापूर<br>४) कनिष्ठ अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>शाखा कार्यालय, लिंगनूर / कापशी, जि.कोल्हापूर<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :–** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) एम.बी. भाजीभाकरे, सदस्य–सचिव

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर मंडल, कोल्हापूर यांनी दि. १४/८/२००६ रोजी दिलेल्या आदेशा विरूध्द तक्रारदार श्री विश्वास मारूती पाटील, चेअरमन, विश्वास इंडस्ट्रिज यांनी प्रस्तुतचे अपील या मंचाकडे सादर केले आहे. सदरचे आदेशानुसार वि.प. यांनी हमीदवाडा फि डर व लिंगनूर फि डर या दोन्ही गावठाण फि डर उभारणीचे काम अग्रक्रमाने पूर्ण करण्याचे तसेच या फि डरवरील फ ॉल्ट टाळण्यासाठी कालबध्द पेट्रोलिंग व मेंटेनन्स करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या होत्या.

२) अर्जदारांच्या तक्रारीचे स्वरूप थोडक्यात खालील प्रमाणे आहे :-

महाराष्ट-कर्नाटक राज्याच्या सीमेवर अर्जुननगर, ता.कागल येथे दहा उद्योजकांची औद्योगिक वसाहत असून त्यामध्ये अर्जदार यांची विश्वास इंडस्ट्रि स्थित आहे. त्यांना भारनियमनाचा मोठा भार सहन करावा लागत असून उर्वरित वेळांत ही सतत वीज खंडित होत असल्याने त्यांना कारखाना सुरळीतपणे चालविणे अवघड झाले आहे. परिणामी त्यांच्या कारखान्यास आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागत आहे. सबब अर्जुननगर स्थित कारखान्यास कायम स्वरूपी वीज पुरवठा योग्य व्होल्टेज प्रमाणे विहित मुदतीत करावा अशी त्यांची मागणी आहे. तसे झाल्यास वि.प. यांना सतत तात्पुरती उपाय योजना करण्याचे कारणपडणार नाही.

३) प्रकरणी सुनावणीची ता. १७/१०/२००६ रोजी नेमली होती. त्यावेळी अर्जदार यांनी आपली बाजू सविस्तरपणे मांडली तसेच वि.प. यांनीही याकामी प्रत्यक्ष जागेवर चालू असलेल्या कामाबाबत तपशीलवार कथन केले. सदरची वस्तुस्थिती खरी असल्याचे अर्जदार यांनी मान्य केले व वितरण कंपनीच्या अधिका-यांनी / कर्मचा-यांनी ओव्हरलोड ट्रीपींगचे प्रमाण कमी केल्याचे त्यांचेकडील उपलब्ध माहितीवरून सांगितले. अर्जदार यांची तक्रार कायम स्वरूपी दूर होण्यासाठी लिंगनूर व कापशी गांवठाण फीडर उभारणीचे काम प्रगतीपथावर असल्याचे व ते काम तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याचे अपेक्षित असल्याचे वि.प. यांनी सांगितले. तशा मजकूराचा खुलासा वि.प यांनी या मंचाकडे दि. १६/१०/२००६ रोजी पाठविला असून त्याप्रमाणे पूर्तता करीत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर अर्जदार यांनी वस्तुस्थिती मान्य करून समाधान व्यक्त केले. अर्जदाराच्या बरोबर अन्य उद्योजकांनाही या योजनेचा फायदा मिळून त्यांच्या उद्योगास कायम स्वरूपी वीज पुरवठा होणार आहे. याबद्‌दल उभय पक्षकारांना खात्री वाटते. वि.प. यांनी कालबध्द कार्यक्रमानुसार २६/१२/२००६पर्यंत कायम स्वरूपी वीज पुरवठा करण्याचे मान्य केल्याने अर्जदार यांनी आपली तक्रार निवारण झाल्याचे मंचासमोर सांगितले. ही बाब विचारांत घेऊन मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१.	वि.प. यांनी मान्य केल्याप्रमाणे दिनांक २६/१२/२००६ पर्यंत हमीदवाडा व लिंगनूर फीडरचे काम पूर्ण करून अर्जदार यांना कायम स्वरूपी वीज पुरवठा करावा.

२.	सदरच्या आदेशाची अंमलबजावणी केल्याचे विनियम २००६ चे कलम ८.३ चे

तरतुदीनुसार मंचास १५/०१/२००७ पर्यंत कळवावे.

| | | |
|---|---|---|
| (एम.बी.भाजीभाकरे) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |